ISSN-2348-2702, Impact Factor : 3.8699, Vol.-X, Issue-III, July-August-September 2022

04

# भारतीय संगीतातील ठुमरी चा इतिहास व विकास

डॉ.वैशाली देशमुख

- सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख संगीत विभाग शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद

भारतीय अभिजात संगीतात अनेक गीतप्रकार अस्तित्वात आहेत.धृपद, धमार, खयाल, तराणा, ठुमरी टप्पा होरी, कजरी, दादरा, सादरा, चतुरंग, त्रिवट इ. अनेक वरील गीत प्रकारापैकी काही गीत प्रकार शास्त्रीय संगीतात येतात तर काही गीतप्रकार उपशास्त्रीय गीतप्रकारात येतात. ठुमरी हा गीतप्रकार उपशास्त्रीय संगीतातील एक महत्वाचा गीतप्रकार म्हणुन ओळखला जातो.

ठुमरी शब्दाची उत्पत्ती हिंदी भाषेत १०व्या शतकानंतर जरी झाली असली तरी याच शब्दाचे मुळ संस्कृत भाषेपर्यंत पोहोचविते ठुक शब्दाचा विकास संस्कृत भाषेतील स्तुम्भ धातुपासून स्तुम्भ शब्दातून मानला जातो.स्तूम्भ म्हणजे गर्व, थांबणे विंâवा अटकाव अडकणे विंâवा थोड्या-थोड्या वेळानी थांबणे. तसेच स्तुम्भचा अर्थ आनंद व्यक्त होणे म्हणूनच ठम आणि ठुम यातून ठमक, ठमकना, ठुमक हे शब्द तयार होवुन त्याचा अर्थ शब्दांमध्ये असा की, अभिमान अहंकर, गर्व, थांबणे, थोड्या थोड्या वेळाने अटकाव विंâवा थांबुन व्यक्त होणे विंâवा ठुमकत चालणे. परंतु अनेक विदवानांच्या मते ठुमरी मुळत: ब्रज भाषेतील शब्द आहे.

श्री सुनील कुमार बोस यांच्या मते ठुम आणि री या दोन शब्दांच्या संयोगातुन ठुमरी शब्द तयार झाला. ठुम शब्दाचा अर्थ ठुमकत चालणे आणि री चा अर्थ रिझविणे विंâवा लुभविणे.आचार्य वैâलासचंद्रदेव बृहस्पति यांच्या मतानूसार ठुमरी शब्द ठुम आणि री हे दोन मिळून ठुमरी शब्द बनतो. ठुम म्हणजे ठुमकणे आणि री म्हणजे मनातील हितगुंज सांगणे. डॉ.शुक्ल यांच्या मते ठुमरी शब्द ब्रज भाषेतील स्त्रीलींगी शब्द आहे. ठुमरी शब्दाचा अर्थ नृत्यासोबत गायीली जाणारी रचना, गेय रचना असा होतो.

भारतीय संगीतात गायनासोबत नृत्य करण्याची परंपरा अतिशय प्राचीन आहे. वैदिक तसेच रामायण व महाभारत काळात समाजामध्ये गायनासोबत नृत्य करण्याचे उल्लेख सापडतात. कालीदास यांच्या मालविकाग्निमित्र नाटकात गीताभिनया चा उल्लेख म्हणजेच नृत्यासोबत गायनाचा उल्लेख आढळतो. यावरून असे लक्षात येते की ठाकुर जयदेवसिंह यांच्या मते दुसNया शतकात गायनासोबत नृत्य करण्याची कला पूर्णपणे विकसित झाली होती. महाकवी बाणभट्ट यांच्या हर्षचरीत ग्रंथामध्ये स्त्रियांचा गायनासोबत नृत्य करण्याचा उल्लेख केलेला आहे. आठव्या शतकात दामोदर यांच्या कुट्टनीमतम् काव्यामध्ये वसतंतोत्सवाच्या वेळी गायन व नृत्याचा उल्लेख आढळतो. वरील सर्व विवेचनावरून हे लक्षात येते की अतिशय प्राचीन काळापासून गायन आणि नृत्य सोबत केल्या जाते.

पं.भरताच्या नाट्यशास्त्रानूसार प्राचीन काळापासूनच भारतीय समाजात नृत्यगान परंपरा अस्तित्वात होती सतराव्या शतकातील गं्रथ रागदर्पण मध्ये असे म्हटले आहे की, ठुमरीचा प्रचार या काळात होता. वॅâप्टन विलर्ड यांच्या म्युजिक ऑफ हिंदूस्थान या ग्रंथात ठुमरीच्या रचना ब्रजभाषेत असलेल्या दिसून येतात.

इ.स. १८४७ मध्ये वाजिद अली शहा यांनी 'अख्तरपिया' नावानी अनेक सादरा ख्याल आणि ठुमरीच्या रचना केल्या, ठुमरी गाणारे पुरूष संगीतज्ञामध्ये सर्वप्रथम गायक उस्ताद सादिक अली खाँ आणि नर्तन बिंदादीन महाराज आहेत. उस्ताद



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

सादिक अली खाँ यांच्याकडून सर्व प्रथम बिंदादीन महाराजांनी ठुमरी गीतप्रकार शिकले आणि अनेक ठुमरींच्या रचना केल्या.

इ.स.१६७५ मध्ये मिर्जा खान इब्नेफखरूद्दीन मोहम्मद नी फारसी भाषेत तोहफतुल हिंद नावाचा ग्रंथ लिहीला त्यामध्ये ठुमरीचा उल्लेख आहे. तसेच इ.स. १६६५ मध्ये कश्मीरचे सुभेदार फकीरूल्लाह यांनी मानकुतुहल नावाच्या ग्रंथाचा फारसी भाषेत अनुवाद ''रागदर्पण'' नावानी केला त्यामध्ये असे म्हटले आहे की बरवा नावाच्या 'धुन' ला साधारण भाषेत बरवा म्हटले जाते आणि काही विदवान त्यालाच ठुमरी देखील म्हणतात म्हणजेच त्यावेळेस ठुमरी प्रचलीत होती. बरवा चेच रूपांतर ठुमरी होते.

तोहफतुल-हिंद ग्ंथ्रथामध्ये रागांचे वर्गीकरण चार मतांमध्ये केलेले दिसून येते, हनुमत मत, कल्लीनाथ मत, सोमेश्वर मत आणि भरतमत या चारही मतांमध्ये ठुमरीला भरतमतर्ची रागीणी म्हटले आहे.

सतरा ते एकोणीसाव्या शतकापर्यंतचा ठुमरीचा इतिहास बघितला तर असे लक्षात येते की, जास्तीत जास्त बरवा, पहाडी, काफी, जगला, भैरवी, सिंध भैरवी, मुलतानी, काफी, देस, पीलू, गारा, बिहारी, खमाज, झिंजोटी, परज, धानी या रागांमध्ये ठुमरी गायली जाते सतराव्या शतकात बरवा पहाडी मध्ये ठुमरी गायनाचा खुप प्रघात होता.

एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीला वाजिद अली शहा यांनी राजदरबारातील संगीत सभांमध्ये ठुमरी गायनासाठी प्रोत्साहन दिले वाजिद अली शहा यांनी तसेच त्यांच्या आलमआरा नावाच्या पत्नीने आलम तसेच बादशाह नसिरूद्दीन हैदर यांचे नातू वजीर मिर्जा यांनी 'कदरपिया' या उपनावांनी अनेक ठुमरींची रचना केली. आजही संगीत सभांमध्ये सादरी करण करण्यासाठी या ठुमNया गायील्या जातात.

लखनऊ दरबारातील प्रसिध्द गायक उस्ताद सादिक अली खाँ यांनी ठुमरी गायनाचे सर्वप्रथम गायक मानले जाते. उ.सादिक अलींचे ठुमरीचे शिक्षण उ.वाजिद अली खाँ यांच्याकडे झाले. उ.सादिक अली खाँ यांचा जन्म १८००मध्ये झाला व त्यांचे १९१० मध्ये देहावसान झाले ते कव्वालबच्चे घराण्याचे संगीततज्ञ होते. मुळात ते ख्यालीये होते परंतु धृवपद, धमार, सादरा, तराणा, टप्पा आणि विशेषत: ठुमरीचे ते संगीततज्ञ होते. त्यामुळे लखनवी ठुमरीचे जन्मदाता आणि प्रचारक म्हणून वाजिद अलींचे नाव सर्वप्रथम घेतले जाते. उसादिक अली खाँ यांच्या शिष्यांमध्ये बिंदादीन भैय्या गणपतराव ठावूर नवाब अली खाँ, रामकृष्णबुवा बझे इ. प्रमुख होते.

लखनवी ठुमरीचे दोन प्रकार महत्वाचे आहेत. नृत्यप्रधान ठुमरी आणि गानप्रधान ठुमरी सादिक अली खाँ यांच्या ठुमरी रचना गानप्रधान ठुमरी प्रकारामध्ये येतात.

भैय्या गणपतराव हे ग्वालीयरचे महाराजा जयाजीराव सिंधिया यांचे व्दितीय पुत्र होते. त्यांची आई एक सुप्रसिध्द श्रेष्ठ गायिका होती. उत्तम हार्मोनियम वादक तसेच श्रेष्ठ ठुमरी रचनाकार म्हणून भैय्या गणपतराव प्रसिध्द होते.

कालांतराने लखनवी ठुमरी व बनारसी ठुमरी असे प्रकार वीसाव्या शतकात प्रचारात आले पुढे बनारसी ठुमरीचे प्रचलन खुप झाले व भारतीय संगीतात वर्तमानकाळात बनारसी ही ठुमरी प्रतिनिधीत्व करते आणि वर्तमान काळात लखनवी ठुमरीचे फक्त नावच राहीले. जुन्या ठुमरी गायिकांमध्ये बडी मोतीबाई, रसुलनबाई, सिध्देश्वरी देवी या उत्तम ठुमरी गायिका होत्या. पुढे गिरीजादेवी व माणिक वर्मा यांनी बनारसी ठुमरीचा प्रचार व प्रसार केला.

वर्तमान काळात ठुमरीचे दोन प्रमुख प्रकार अस्तित्वात आहेत :

१) बोलबाँट ची ठुमरी

२) बोलबनाव ची ठुमरी

१) बोलबाँट ची ठुमरी : लखनऊ तसेच फरूखाबाद, इटावा, बरेली, रामपुर, मथुरा व दिल्ली या ठिकाणी बोलबाँटच्या ठुमरीचा अधिक प्रसार झालेला दिसून येतो. या ठुमरीला बंदिश की ठुमरी असे देखील म्हटले जाते. या ठुमरीमध्ये ब्रजभाषेचा उपयोग होतो. कृष्णाच्या विविध लीलांचे वर्णन हा विषय ठुमरीमध्ये महत्वपूर्ण आहे. तसेच प्रेमाची अभिव्यक्ती



Govt. College of Arts & Science * Aurangabad *
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

अाणि वियोगावस्थेचे देखील वर्णन या ठुमरीमध्ये आढळते. फरूखाबादचे 'ललनपिया' या ठुमरीचे प्रचारक व प्रधान मानले जातात. बंदिशीला विशेष महत्व असल्यामुळे बोलबाँटच्या ठुमरीतील बंदिशी कलात्मक, सुगठित व लयबध्द असतात. या ठुमरीमध्ये नृत्य, ख्याल, सतार वादन आणि तराणा शैलीचा स्पष्ट प्रभाव दिसून येतो. शब्दांचे तसेच बंदिशीचे भावपूर्ण गायन करण्याची विशेषता यामध्ये दिसून येते. त्रिताल किंवा अध्धा त्रिताल यामध्ये अधिक गायील्या जातात. तसेच रूपक, एकताल आडाचौताल यामध्ये पण ठुमरीच्या बंदिशी आढळुन येतात.मुख्य रूपाने रागगायनाची विशेषता या ठुमरीची आहे.

२) बोलबनाव ची ठुमरी : या ठुमरीमध्ये गायकीला जास्त महत्व दिले जाते. या ठुमरी प्रमुखतेनी गायकीप्रधान असतात. लोकसंगीताचा प्रभाव या ठुमरीवर अधिक दिसुन येतो. मुख्यत: मांड, बिहाग, पहाडी, खमाज, तिलंग, गारा, झिंजोटी, बिहारी, तिलक कामोद, देस, जोगिया, कालींगडा, परज, सोहनी, काफी, सिंदुरा वैगेरे रागांमध्ये ही ठुमरी गाण्याची पध्दत आहे.

बोलबनावची ठुमरी ब्रज, अवधी व भोजपुरी भाषेमध्ये असते. तसेच उर्दु भाषेचाही अल्प प्रमाणात प्रयोग केला जातो. रागाचे आविर्भाव - तिरोभाव, कण, मुर्की, खटका, जमजमा आदिंचा भावाभिव्यक्तीसाठी उपयोग केला जातो. यामध्ये बंदिशी सरळ आणि लहान असतात. यामध्ये स्थायी आणि एक अंतरा असतो. बोलबनावच्या ठुमरीमध्ये विलंबित लयींचा जास्त प्रयोग केला जातो. त्यामध्ये दिपचंदी, जत आणि पंजाबी तालांचा प्रयोग जास्त केला जातो.

बोलबनावच्या ठुमरीचे मुख्य दोन प्रकार आहेत :

१) पुरब अंग ठुमरी
२) पंजाब अंग ठुमरी

१) पुरब अंग ठुमरी : ही ठुमरी उत्तर प्रदेश व बिहार प्रदेशात जास्त प्रचारात आली. त्यामुळे त्याला पुरब अंग ठुमरी म्हटले जाते. या ठुमरीमध्ये कजरी चैती, पुरबी अशा लोकगीतांच्या अधिक प्रभाव दिसून येतो. यामध्ये बोल अाणि स्वरांच्या माध्यमाने बढत केली जाते. तसेच आविर्भाव तिरोभाव करून दुसNया रागाची छाया दाखवितात. मुळ राग बदलुन इतर रागांचे मिश्रण केले जाते. यामुळे या ठुमरीला मांझ किंवा जिला असे म्हटले जाते. तसेच या ठुमरीमध्ये दर्द, हुक व पुकार यांचा भाव अभिव्यक्तीसाठी उपयोग केल्या जातो. उदा. अरे हाँ, हो, हाय इ. शब्दांचा संबोधक म्हणून उपयोग केल्या जातो. या ठुमरीची विशेषता म्हणजे सुरेल, चैनदारी स्वरांचा विशिष्ट लगाव इ.आहेत.

पुरब अंगच्या ठुमरीचे दोन प्रकार आहेत :

१) लखनवी ठुमरी
२) बनारसी ठुमरी

१) लखनवी ठुमरी : लखनऊ आणि त्याच्या जवळील भागामध्ये या ठुमरीचा मुख्य विकास झालेला दिसून येतो. यामध्ये ब्रजभाषेसोबत अवधी भाषाही वापरली जाते. लखनवी ठुमरीवर राजदरबारातील संस्कृतीचा प्रभाव असलेला दिसून येतो. लखनवी ठुमरीमध्ये नृत्यात्मकता, बोलबनाव, शृंगार हे गुण प्रधानतेनी दिसून येतात. लखनवी ठुमरी म्हणजे अवधी राजयुगाची लोकसभ्यताची देणगी म्हणता येईल. भाव प्रधानता हे मुख्य लक्षण असुन अभिव्यक्तीसाठी कलात्मक बोलांचा श्रृंगारीक पध्दत्तीने वापर केला जातो. या ठुमरीचे उदाहरण द्यायचे तर तरनवाका जिद अली शहा यांची अख्तर कृत भैरवी मधील ठुमरी प्रसिध्द आहे.

स्थायी भैरवी ठुमरी

१) बाबुल मोरा नइहर छुटो जाय ।
अंतरा
चार कहार मिल डोलिया उठावे ।
अपना बेगाना छुटो ही जाय ।

लखनवी ठुमरी मध्ये उर्दु शब्द येण्याचे कारण गजल आणि उर्दु शायरीचा विकास आणि प्रचाराचे मुख्य केंद्र लखनऊ होते. मधुन मधुन ठुमरीमध्ये शायरी म्हणणाच्या देखील्ी प्रभाव दिसून येतो.

२) बनारसी ठुमरी : बनारस आणि त्याच्या बाजुच्या क्षेत्रामध्ये ही ठुमरी गाण्याचा प्रघात दिसून येतो. म्हणून या ठुमरीला बनारसी ठुमरी म्हटले जाते. ब्रज,



Govt. College of Arts & Science Aurangabad.
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science

अवधी भाषेसोबत भोजपुरी आणि मगही या पुर्वी उत्तर प्रदेशातील भाषांचा ठुमरीमध्ये प्रभाव दिसून येतो.

तसेच कजरी, चैती, होरी, झुला इ. लोकगीतांचा देखील या ठुमरीमध्ये प्रभाव दिसून येतो. या ठुमरीमध्ये कहन तसेच दर्द, पुकार, हुक या काकुंचा प्रयोग केला जातो.

क्रमानूसार स्वरांची सरळ व सहज बढत तसेच कहन या अंगावर अधिक लक्ष दिले जाते. यामध्ये अलंकरण करण्यासाठी दोहा, सोरठा, सवैया, कवित्त यांचा प्रयोग केला जातो.

२) पंजाब अंग ठुमरी : पंजाबच्या पहाडी भागात ही ठुमरी प्रचारात आली त्यामुळे या ठुमरीला पंजाब अंगाची ठुमरी म्हटले जाते. यामध्ये हिंदी, ब्रज, अवधी, भोजपुरी भाषांचा प्रयोग केला जातो. खटका, मुर्की, कण तसेच टप्पा शैलीतील छोट्या तानांचा प्रयोग या ठुमरीची विशेषता आहे. यामध्ये गायकाची गायनाची तयारी अधिक महत्वाची असते. या ठुमरीचे प्रवर्तक बरकत अली तसेच बडे गुलाम अली खाँ मानले जातात.

अशा प्रकारे वरील ठुमरीचे सर्व प्रकार वर्तमान काळातील विकसित रूप असून आज ठुमरीला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. कलाकार महफलीची सांगता ठुमरीनेच करतांना दिसून येतात. भावप्रधानता ठुमरीचा विशेष गुण असल्यामुळे व श्रृंगारप्रधानता मुख्य गुण असल्यामुळे जनसामान्यांचा जिव्हाळ्याचा विषय म्हणून ठुमरी आज जग प्रसिध्द गानशैली म्हणून विकसित झालेली दिसून येते. आज ठुमरीशैलीचे विकसनशील रूप आज आपल्यासमोर आहे. आणि भविष्यात देखील ठुमरीचे महत्व टिवूâन राहील.

**संदर्भ ग्रंथ :**


१) ठुमरी की उत्पत्ती, विकास और शैलीयाँ, शत्रुघ्न शुक्ला.
२) भारतीय शास्त्रीय संगीत के विविध आयाम डॉ.रेणू राजन
३) संगीत स्वरावली - वसंत
४) संगीतराज - महाराणा वुंâभा
५) कथ्थक नृत्य -लक्ष्मीनारायण गर्ग


♦♦♦

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad